RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ६३

दि. २७ जून २०२६, वार : शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## सरस्वती महाविद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी



**लातूर/प्रतिनिधी :** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य डॉ.पांडुरंग गोरे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.बालाजी शिंदे, प्रा.डॉ.संतोष कुलकर्णी,प्रा. डॉ. वसंत बंडे,प्रा.डॉ. सुदाम पवार,प्रा.डॉ.राम खलंग्रे ,प्रा. ज्योती मामडगे,प्रा.डॉ. मोनालिसा खानोरकर, प्रा. रवि चव्हाण, प्रा.सलील शहाजिंदे, प्रा.श्रीमंत दोरवे, श्री. विठ्ठल चव्हाण,श्री. बळीराम कदम, सौ.भागिरथी लाड तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सियाचा भाऊ आणि बॉयफ्रेंड हे खास मित्र, केतनला संपवण्याचा प्लॅन आणखी काहीजणांना माहिती; वडिलांचा संशय

**मुंबई/प्रतिनिधी :** पुण्यातील लोहगड हत्या प्रकरणामध्ये मयत केतन अग्रवालच्या वडिलांनी आता नवा संशय व्यक्त केला आहे. सियाचा भाऊ साहिल आणि तिचा बॉयफ्रेंड हे खास मित्र होते, त्यामुळे केतनच्या हत्येचा प्लॅन हा आणखी काही जणांना असण्याचा संशय आहे, असे विशाल अग्रवाल म्हणाले. विशाल अग्रवाल यांनी मुख्यमंर्त्यांची भेट घेऊन आरोपींना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी केली. पुण्यातील लोहगडवर उद्योगपती असलेल्या केतन अग्रवालची १८ जून रोजी हत्या करण्यात आली. केतनची होणारी पत्नी सिया गोयल आणि तिचा बॉयफ्रेंड चेतन चौधरी यांनी त्याला गडावरून ढकलून देऊन हत्या केल्याचं समोर आलं. या प्रकरणात आता सियाच्या भावाची, म्हणजे साहिल गोयलची चौकशी करण्यात येत आहे. केतनच्या हत्या प्रकरणात सिया आणि चेतन यांच्याबरोबरच अजून काही लोकांचा हात असण्याची शक्यता विशाल अग्रवाल यांनी व्यक्त केली.

केतन डोक्याला विग वापरायचा ही माहिती लग्नाच्या आधी सियाला आणि तिच्या कुटुंबाला देण्यात आली होती. परंतु हत्या करण्याचं हे काही कारण असू शकत नाही, असं विशाल अग्रवाल म्हणाले. लग्नासाठी नकार देणं हे सियासाठी खूप सोपं होतं, त्यासाठी तिने केतनची हत्या करण्याची गरज नव्हती, असं विशाल अग्रवाल म्हणाले. दरम्यान, केतन अग्रवाल हत्या प्रकरणात आता आणखी काही लोकांची चौकशी करण्यात येत आहे. सियाचा भाऊ साहिल याचीही चौकशी करण्यात येत आहे. साहिल आणि आरोपी चेतन चौधरी हे खास मित्र असल्याने या प्रकरणात आणखी काही लोकांचा समावेश असावा असा संशय विशाल अग्रवाल यांनी व्यक्त केला.

## राम मंदिराच्या कोट्यवधीच्या देणगीत डल्ला; चंपत राय आणि अनिल मिश्रांचा राम मंदिर ट्रस्टमधून राजीनामा

**मुंबई/प्रतिनिधी :** राम मंदिर दान प्रकरणात एक मोठे वळण आले आहे. राम जन्मभूमी ट्रस्टचे सदस्य, चंपत राय आणि अनिल मिश्रा यांनी राजीनामा दिला आहे. घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या एसआयटीच्या प्राथमिक अहवालातील कडक शिफारशींनंतर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. एसआयटीच्या शिफारशींच्या आधारे या प्रकरणात पहिला एफआयआर आधीच दाखल करण्यात आला आहे. हे राजीनामे तपासाच्या कारवाईशी जोडले जात आहेत. एसआयटी सध्या राम मंदिरातील घोटाळ्याची चौकशी करत आहे. तपास यंत्रणा आरोपींची बँक खाती, मालमत्ता, मोबाईल रेकॉर्ड आणि कथित व्यवहारांची तपासणी करत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एसआयटीच्या प्राथमिक अहवालात काही ठोस शिफारसी करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे तपासाला आणखी गती मिळाली आहे.या संदर्भात, चंपत राय आणि अनिल मिश्रा यांचे राजीनामे देखील या तपासाशी जोडले जात आहेत. सध्या, या संपूर्ण प्रकरणात अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. एसआयटीच्या अंतिम अहवालात आणखी महत्त्वपूर्ण खुलासे होतील का? तपासाची व्याप्ती वाढेल का? आणि ट्रस्टच्या कामकाजात काही बदल होतील का? या सर्व प्रश्नांची उत्तरे येत्या काही दिवसांत तपास पुढे सरकल्यावर मिळतील.

# अस्पृश्यांना पन्नास टक्के आरक्षण देणारा पहिला संस्थानिक राजा छत्रपती शाहू महाराज





**लातूर/प्रतिनिधी :** स्वातंत्र्यपूर्व काळात दबलेल्या पिचलेल्या अस्पृश्यांना इतरांच्या बरोबरीने आणण्यासाठी पन्नास टक्के सामाजिक आरक्षण कुणीही न मागता देऊन सामाजिक न्यायाची मूर्तमेढ छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात रोवली असे प्रतिपादन पूजनीय भिकू पयानंद थेरो यांनी केले. जेष्ठ नागरिक विचार मंचाच्या वतीने आयोजित छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक येथे आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले या देशात स्वातंत्र्यपूर्वकाळात दोनच संस्थानिक राजे हे पुरोगामी आणि समतावादी होते त्यात कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज व बडोद्याचे सयाजीराव गायकवाड महाराज या दोन राज्यांनी या देशाला समतेचा विचार दिला.

छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा सक्तीचा कायदा केला आणि शिक्षणाचा समान हक्क तमाम मागासवर्गीयांना देऊन त्यांना इतरांच्या बरोबरीने आणण्याचा मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न शाहू महाराजांनी केला आणि म्हणून शाहू महाराज हे समतेचे पुरोगामीत्वाचे व शिक्षणाच्या क्रांतीचे प्रणेते होते म्हणूनच या जयंतीच्या निमित्ताने त्यांना अभिवादन करताना प.पु. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी सुद्धा छत्रपती शाहू महाराजांच्या समतेचा विचार भारतीय राज्यघटनेत नमूद केला आणि म्हणून आज जयंतीच्या निमित्ताने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये छत्रपती शाहू महाराजांना अभिवादनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी सर्वप्रथम छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेस ज्येष्ठ नागरिक विचार मंचाचे सूर्यभान लातूरकर त्र्यंबक कवठेकर गौतम चिकाटे प्रेमनाथ अंकुशे रघुनाथ शिखरे दुष्यंत आंगरखे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले यावेळी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी कर्मचारी संघटनेच्या माता भिमाई ग्रुप शाक्य संघाचे सर्व पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केशव कांबळे यांनी केले यानंतर छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेची मिरवणूक सवाद्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती शाहू महाराज चौकापर्यंत काढण्यात आली.



राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस जिल्हाधिकारी कार्यालय येथे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्ष उषाताई पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार विक्रम काळे, आमदार बसवराज पाटील, आमदार संजय बनसोडे, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी उपस्थित होते.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त जन्मस्थळी विविध मान्यवरांकडून अभिवादन

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या जन्मस्थळ असलेल्या लक्ष्मी विलास पॅलेस येथे विविध मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. समाजसुधारक, लोककल्याणकारी राजा आणि सामाजिक समतेचे पुरस्कर्ते म्हणून शाहू महाराजांचे कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे यावेळी व्यक्त करण्यात आले.

यावेळी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, आमदार सतेज पाटील, आमदार अमल महाडिक, महापौर रूपाराणी निकम, विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल, शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, शाहू जन्मस्थळ जतन विकास समितीचे इंद्रजीत सावंत, वसंतराव मुळीक यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी समाजातील वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी केलेले कार्य, सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली करण्याचा दूरदर्शी निर्णय, सामाजिक न्यायासाठी आरक्षणाची मुहूर्तमेढ रोवणे तसेच जातीभेद निर्मूलनासाठी घेतलेले धाडसी निर्णय यांचे यावेळी स्मरण करण्यात आले. त्यांच्या विचारांवर आणि आदर्शांवर चालण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

## अवैध दारू व्यवसायावर मुरूड पोलिसांची कारवाई, १ लाख ३४ हजार रुपयांचा देशी दारूसाठा व कार जप्त, दोन आरोपींना अटक




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील अवैध दारूची वाहतूक, साठवणूक व विक्री करणाऱ्यांविरोधात पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत मुरूड पोलीस स्टेशनच्या पथकाने तात्काळ व नियोजनबद्ध कारवाई करून १ लाख ३४ हजार रुपयांचा अवैध देशी दारूसाठा आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली कार जप्त करत दोन आरोपींना अटक केली आहे.

दि. २६ जून २०२६ रोजी सकाळी सुमारे ९.२० वाजण्याच्या सुमारास मुरूड पोलिसांना अंकोली परिसरात एका कारमधून अवैध देशी दारूची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ सापळा रचून संशयित मारुती सुझुकी आल्टो (क्र. -२४ -७९५४) या वाहनाची तपासणी केली.

तपासणीदरम्यान वाहनामध्ये ९० एमएलच्या सिमला संत्रा व टँगो पंच कंपनीच्या एकूण १,६०० सीलबंद देशी दारूच्या बाटल्या आढळून आल्या. या दारूसाठ्याची किंमत ६४ हजार रुपये असून, वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या ७० हजार रुपये किमतीच्या कारसह एकूण १ लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

या कारवाईत १) महेश लक्ष्मण गायकवाड (वय २४, व्यवसाय चालक, रा. खंडापूर, ता. जि. लातूर) २) महादेव शंकर गायकवाड (वय ४२, व्यवसाय मजुरी, रा. खंडापूर, ता. जि. लातूर) यांना अटक करण्यात आली. प्राथमिक तपासात आरोपी कोणताही वैध परवाना न घेता आर्थिक फायद्याच्या उद्देशाने अवैध देशी दारूची चोरटी वाहतूक व विक्री करण्यासाठी हा साठा घेऊन जात असल्याचे निष्पन्न झाले आहे.

याप्रकरणी पोलीस स्टेशन मुरूड येथे गुन्हा क्रमांक १९५/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(अ)(ई), ८१ व ८३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक रामदास बलभीम नाडे यांनी फिर्याद दिली असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. अंधारे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक रामदास नाडे, सहायक फौजदार दशरथ गिरी, रामचंद्र जाधव, पोलीस अमलदार हणमंत माने, कोळी यांनी केली आहे. पुढील तपास पोलीस अमलदार माने हे करीत आहेत.

# जगाला अन्न पुरविण्याची क्षमता भारतात; तंत्रज्ञानाधारित शेतीचा स्वीकार काळाची गरज

### पद्मश्री डॉ. श्रीरंगदादा लाड; एमआयटीमध्ये भारतीय किसान संघाचा शेतकरी मेळावा

**लातूर/प्रतिनिधी :** भारत हा केवळ कृषीप्रधान देश नसून जगाच्या अन्नसुरक्षेची जबाबदारी पेलण्याची क्षमता भारतीय शेतकऱ्यांमध्ये आहे. मात्र त्यासाठी शेतीमध्ये संशोधन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि तंत्रशुद्ध शेतीपद्धतीचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन पद्मश्री कृषी संशोधक डॉ. श्रीरंगदादा लाड यांनी केले.

भारतीय किसान संघाच्या वतीने अंबाजोगाई रोडवरील विश्वनाथपूरम येथील एमआयटी शिक्षण संस्था संकुलातील संत श्री ज्ञानेश्वर महाराज डोम येथे आयोजित भव्य शेतकरी मेळाव्यात डॉ. श्रीरंगदादा लाड प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी भारतीय किसान संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले, विभागीय संघचालक संजय अग्रवाल, एमआयटी समूहाचे विश्वस्त तथा रामेश्वरचे माजी सरपंच तुळशीरामअण्णा कराड, एमआयटी समूहाचे संचालक प्रा. तेजस कराड, महिला विभाग प्रमुख शामलताई हुरदळे आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना डॉ. श्रीरंगदादा लाड म्हणाले, शेती ही केवळ व्यवसाय नसून ती आपली संस्कृती आणि जीवनाचा आधार आहे. शेतकऱ्यांनी 'भारत मातेसाठी काहीतरी करण्याची' भावना जोपासत शेतीकडे पाहिले पाहिजे. प्रत्येक पिकामध्ये संशोधनाची दृष्टी ठेवून आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास कमी खर्चात अधिक उत्पादन घेणे शक्य आहे. मर्यादित बियाण्यांच्या वापरातूनही तंत्रशुद्ध पद्धतीने विक्रमी उत्पादन मिळू शकते, असा अनुभव त्यांनी यावेळी मांडला.

आपल्या संशोधन प्रवासाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, लहानपणापासून शेतीची आवड असल्याने नावीन्यपूर्ण प्रयोग करण्याची प्रेरणा मिळाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील कार्यकाळात शेती संशोधनाची दिशा मिळाली आणि त्यातून कापूस पिकावरील संशोधनाला सुरुवात झाली. या संशोधनाला विद्यापीठाची मान्यता मिळाल्यानंतर देशासह जगभर त्याचा स्वीकार झाला. आज शेतकऱ्यांचे वाढलेले उत्पादन आणि उत्पन्न हेच आपल्या संशोधनाचे खरे यश असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी डॉ. लाड यांच्या हस्ते लातूर जिल्ह्यातील उपक्रमशील शेतकऱ्यांचा तसेच एमआयटी महाविद्यालयातील विविध स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला. प्रत्यक्ष शेती करणाऱ्या युवा प्रतिनिधी वैभवी जितेश चापसी यांची भारतीय किसान महासंघाच्या नव्या जबाबदारीसाठी नियुक्ती जाहीर करण्यात आली.

अध्यक्षीय समारोपात प्रा. तेजस कराड म्हणाले, ''शेतकरी सक्षम झाला तर राष्ट्र सक्षम होईल.'' शेतीमध्ये आधुनिक विचार, तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचा स्वीकार करून तरुणांनी मोठ्या प्रमाणावर शेती क्षेत्रात उतरले पाहिजे. शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय किसान संघ राबवत असलेल्या उपक्रमांना एमआयटी समूहाचा कायम सक्रिय पाठिंबा राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले यांनी मेळाव्याच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली, तर विभागीय संघचालक संजय अग्रवाल यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास आराध्ये व परमेश्वर सोनवणे यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या मेळाव्यास लातूर जिल्ह्यातील शेकडो शेतकऱ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

संपादकीय...

## इंधन तेलाच्या दराची घसरण आर्थिक लाभ वाढविणारी

संकटे येताना नेहमी एकदम येतात, तशीच जातानाही ती एकत्र जावीत ही प्रत्येकाची अपेक्षा असते. मार्च ते जून हा अत्यंत क्लेशदायक आणि चिंताजनक काळ अनुभवणाऱ्या प्रत्येक भारतीयाने याच अपेक्षेत १०० दिवसांचा टप्पा पार केला. एकीकडे प्रचंड उष्णता आणि 'अल निनो'मुळे वाढलेली मान्सूनची चिंता, तर दुसरीकडे इंधनटंचाईमुळे उद्भवलेले दैनंदिन जीवनातील प्रश्न, असा दुहेरी मारा सहन करत सर्वसामान्य मेटाकुटीला आले होते. एरव्ही जगात घडणाऱ्या घडामोडींशी आपला काय संबंध, असे मानून त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या गावखेड्यातल्या सामान्य माणसाचे 'होर्मुझ'शी संबंधित अमेरिका-इराण यांच्या नेत्यांकडून होणाऱ्या वक्तव्यांकडे लक्ष लागून राहिले होते. त्याचवेळी त्याची नजर आकाशाकडेही होती. चार दिवसांपूर्वी मान्सूनची बरसात सुरू झाली आणि पाठोपाठ आखातातील युद्धविराम टिकाऊ ठरणार असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे कच्च्या तेलाच्या दरामध्ये मोठी घसरणही सुरू झाली. भारतासाठी हा दुग्धशर्करा योगच म्हणावा लागेल. कारण, या दोन्ही घडामोडी भारतीय अर्थकारणापुढील अनेक चिंतांचे ओझे कमी करणाऱ्या आहेत. मान्सून हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला, तर इंधन हे अर्थव्यवस्थेचे वंगण आहे. या दोन्हींचा पुरवठा कमी झाल्यास भारताचे आर्थिक चक्र कोलमडते. इंधनाच्या पातळीवरील दिलासा सरकार, उद्योजक आणि सर्वसामान्यांसाठी अत्यंत मोलाचा आहे. गेल्या तीन महिन्यांचा कालखंड कच्च्या तेलाच्या दरातील विक्रमी घुसळणीसाठी ओळखला जाईल. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विधानांमुळे या काळात एकाच दिवसातील ८०० ते १,२०० अंकांपर्यंतचे चढ-उतार एमसीएक्स क्रूडमध्ये पाहायला मिळाले. कमोडिटी मार्केटमध्ये क्रूड ऑईलच्या क्षेत्रात ट्रेडिंग करणाऱ्या अनेकांनी लाखो रुपयांचा नफा मिळवला, तर अनेकांना मोठा फटकाही सहन करावा लागला. तथापि, ६० दिवसांचा शस्त्रसंधी करार हा विश्र्वासार्ह वाटू लागल्यामुळे तेल बाजारात घसरणीचे वारे वेगाने वाहत आहेत. होर्मुझमधून खनिज तेलाची वाहतूक सुरक्षितपणे सुरू झाल्याने या घसरणीला वेग आला आहे. अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ला केल्यानंतर तेलाचे भाव प्रतिबॅरल १२० ते १२५ डॉलर्सवर गेले होते. आता ते थेट ७२ ते ७५ डॉलर्सवर आलेत. गेल्या आठवड्यात तेलाच्या किमतीत सुमारे ८ टक्क्यांची घसरण होऊन दर चार महिन्यांच्या नीचांकी पातळीवर आलेत. होर्मुझमध्ये अडकलेली सुमारे ५० लाख बॅरल्स कच्चे तेल वाहून नेणारी तीन मोठी जहाजे सुरक्षितपणे बाहेर पडली आहेत. ओमानने या व्यापारी मार्गावर कोणताही कर न लावता जहाजांच्या सुरक्षित प्रवासासाठी दोन स्वतंत्र मार्ग उपलब्ध करून दिले. आगामी काळातही इराण आणि ओमान यांच्याकडून या तेलवाहू जहाजांकडून करवसुली करण्यात येणार नाहीये. तेलपुरवठ्याबाबत निर्माण झालेली चिंता बऱ्याच अंशी दूर झाल्यामुळे विकसनशील, गरीब देशांच्या अर्थव्यवस्थांना दिलासा मिळणार आहे. अमेरिकेने इराणवरील आर्थिक निर्बंध उठवले. दीर्घकाळानंतर आता इराणचे तेल जागतिक बाजारात खळाळणार आहे. २१ ऑगस्टपर्यंत इराणला कच्चे तेल, पेट्रोलियम आणि पेट्रोकेमिकल उत्पादनांचे उत्पादन व आंतरराष्ट्रीय बाजारात विक्री करण्याची परवानगी मिळाली आहे. होर्मुझमधील सागरी वाहतूक सुरक्षित ठेवण्याच्या कराराचा हा एक भाग आहे. जागतिक तेल बाजारात इराणचे स्थान अत्यंत महत्त्वाचे राहिले आहे. इराणकडे कच्च्या तेलाचा मोठा साठा असून तो 'ओपेक' या खनिज तेल उत्पादक देशांच्या संघटनेचा संस्थापक सदस्य आहे. इराणचे तेल मध्यम दर्जाचे सल्फरयुक्त असून आशियाई देशांमधील तेल शुद्धीकरण कारखान्यांसाठी तांत्रिकदृष्ट्या अत्यंत योग्य मानले जाते. एकेकाळी भारताला कच्चे तेल पुरवणारा इराण हा तिसरा सर्वात मोठा देश होता. २०१९ मध्ये अमेरिकेमुळे भारताला इराणकडून होणारी तेल आयात पूर्णपणे बंद करावी लागली. यानंतर रशिया आणि सौदी अरेबियावर भारताचे अवलंबित्व वाढले. आता इराणचे तेल पुन्हा भारताचे दार ठोठावते आहे. हे तेल भारतीय रिफायनरीजना प्रक्रिया करण्यासाठी सोपे आहे. तसेच, भौगोलिकदृष्ट्या इराण भारताच्या जवळ असल्याने वाहतुकीचा खर्चही कमी होतो. युद्धबंदीचा तात्पुरता निर्णय कायमस्वरूपी करारामध्ये बदलला, तर भारताला इराणच्या रूपाने एक विश्र्वासार्ह आणि स्वस्त तेलपुरवठादार पुन्हा मिळेल. यामुळे परकीय चलनाची मोठी बचत होईल आणि देशांतर्गत इंधनाचे दर नियंत्रणात ठेवण्यासही मोठी मदत होईल. तथापि, पश्र्चिम आशियातील बदलती समीकरणे पाहता, भारताला या व्यापारी संधीचा लाभ घेताना भूराजकीय पातळीवर संतुलन साधावे लागेल. कारण, सौदी अरेबिया व यूएई हे देश भारताला तेलपुरवठा करण्याबरोबरच अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूकही करत आहेत. इराण या देशांचा पारंपरिक वैरी आहे. तेलव्यवहारातून आर्थिकदृष्ट्या बळकट झाल्यास इराण या भागात आपले वर्चस्व वाढवेल, अशी भीती या देशांना आहे. त्यामुळे भारताने इराणकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी सुरू केल्यास त्याचा मध्य पूर्वेतील देशांशी संबंधांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. अडचणीच्या काळात तेलपुरवठा अखंडित ठेवून भारताच्या पाठीशी राहणाऱ्या यूएई, रशियाचा विचार भारताला करावा लागेल. तेल बाजारातील स्पर्धेचा आणि घसरलेल्या दरांचा लाभ आता भारताला मिळणार आहे. तेल कंपन्यांनी येणाऱ्या काळात तो ग्राहकांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाची किंमत प्रतिबॅरल १ डॉलरने कमी झाली, तर भारताच्या वार्षिक आयात बिलात सुमारे १.२० ते १.३० अब्ज डॉलर्स म्हणजेच जवळपास १० ते ११ हजार कोटी रुपयांची बचत होते. एप्रिल महिन्यात आंतरराष्ट्रीय बाजारात भारतासाठीच्या कच्च्या तेलाची सरासरी किंमत प्रतिबॅरल ११४.४८ डॉलर्सवर पोहोचली होती. या एकाच महिन्यात भारताने अवघे २०.१ दशलक्ष टन तेल आयात करूनही त्यासाठी तब्बल १,३६,००० कोटी रुपये मोजले. गतवर्षीच्या तुलनेत आयात ४.३ टक्क्यांनी कमी होऊनही बिल ५० टक्क्यांनी वाढले. आता ११४ डॉलर्सवरून ७४ डॉलर्सपर्यंत झालेली तेल दरातील घसरण ५० हजार कोटींची बचत करून देणारी आहे. यामुळे चालू खात्यावरील तूट कमी होणार असून रुपयालाही बळकटी मिळू शकेल. देशातील कृषी क्षेत्र, उद्योग क्षेत्रही या घसरणीने आनंदले आहे. रंगनिर्मिती, टायरनिर्मिती, विमान वाहतूक क्षेत्र, प्लास्टिक यासह सर्वच उद्योग-व्यवसायांसाठी तेल दरातील घसरण उत्पादन खर्च कमी करून नफा वाढवण्यास हातभार लावणारी आहे. मान्सून आणि इंधनाचा दिलासादायक प्रवास असाच सुरू राहिल्यास काल-परवापर्यंत दाटलेले आर्थिक संकटांचे मळभ दूर होण्यास मोठा हातभार लागेल.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना : ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी !



भारत हा कृषिप्रधान देश असून देशाच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. शेती हा राज्याच्या अर्थव्यवस्थेतील एक महत्वाचा घटक आहे. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर राहणाऱ्यांना उपजीविका देण्याचे काम हा महत्वपूर्ण घटक करतो. म्हणूनच शेती हा घटक अन्न सुरक्षा,रोजगार आणि ग्रामीण विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावतो.

मात्र गेल्या काही वर्षांपासून सतत होणारे हवामान बदल, जमीन आणि पाण्याची टंचाई, बियाणे आणि खतांवरील वाढता खर्च आणि बाजारपेठेतील अनिश्चितता यामुळे शेतीसमोर अनेक आव्हाने दिवसेंदिवस वाढत आहेत. या समस्येचे निराकरण करण्यासाठी राज्य शासन अनेक उपाययोजना करत असते जसे की, शेतीचे उत्पादन वाढविणे, हवामान बदलास अनुकूल आणि शाश्वत शेतीला चालना देणे, सिंचन व्यवस्था आणि जलसंधारणात सुधारणा करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे. याशिवाय शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासाठी प्रोत्साहित करणे, शेतकरी गटांना बळकट करणे आणि बाजारपेठ उपलब्धतेत सुधारणा आणणे यासारखेही प्रयत्न केले जात आहेत.

मात्र आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी गेली काही वर्षे अनेक नैसर्गिक व आर्थिक संकटांचा सामना करत आहेत. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी गारपीट यामुळे शेतपिकांचे प्रचंड प्रमाणावर नुकसान होत आहे. या सगळ्याचा परिणाम अनेकदा वाढता उत्पादन खर्च आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी शासनाकडून राबविण्यात येणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना महत्त्वाची ठरते. शेतकरी कर्जमुक्ती योजना म्हणजे शेतकऱ्यांनी बँका किंवा वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाची संपूर्ण किंवा अंशतः माफी. शासनाच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी होतो, आणि त्यांना नव्याने शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळते. कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांच्या मानसिक तणावात घट होते. तसेच त्यांच्या आर्थिक स्थैर्याला आधार मिळतो. कर्जमुक्तीनंतर शेतकरी नव्याने पीक कर्ज घेऊन शेतीमध्ये गुंतवणूक करू शकतात. यामुळे उत्पादन वाढीस मदत होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी मिळणार आहे.

तथापि, कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांच्या समस्यांवरील कायमस्वरूपी उपाय नाही. शेती क्षेत्रातील मूलभूत अडचणी दूर करण्यासाठी सिंचन सुविधा, पीकविमा, साठवणूक व्यवस्था, बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतीमालाला योग्य हमीभाव यांसारख्या उपाययोजनांची आवश्यकता आहे. शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे. त्याच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि शेती व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी कर्जमुक्तीसारख्या योजनांची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र, दीर्घकालीन विकासासाठी शाश्वत कृषी धोरणे आणि सर्वसमावेशक ग्रामीण विकास हाच खरा मार्ग आहे. शेतकरी सक्षम झाला तरच देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल आणि ग्रामीण भारताच्या विकासाला नवी दिशा मिळेल.

**राज्य शासनाकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजना**

राज्य शासनाकडून शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविल्या जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, नमो शेतकारी महासन्मान निधी योजना, प्रधानमंत्री किसान मानधन योजना राबविल्या जातात. यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांना विविध प्रकारचे आर्थिक सहाय्य देण्यात येते. याशिवाय प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि हवामानावर आधारित फळपिक विमा योजना याद्वारे नैसर्गिक आपत्ती, कीड किंवा रोगांमुळे पीक आणि फळपिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येते. किमान आधारभूत किंमत योजना इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषी बाजार असे उपक्रम सुद्धा गेल्या काही वर्षात सुरू करण्यात आले आहेत.

कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्ता याचा वापर* महाराष्ट्रात करण्यात येत आहे. राज्य शासनाने कृत्रिम बुद्धीमत्ता आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी 'महाराष्ट्र कृषी कृत्रिम बुद्धीमत्ता धोरण (महा कृषी एआय)' २०२५-२०२९ आणले आहे. याअंतर्गत शेतकऱ्यांना उपग्रह तंत्रज्ञान आणि भौगोलिक माहितीच्या आधारे पिकांची स्थिती, जमिनीचा ओलावा आणि इतर भौगोलिक घटकांचे विश्लेषण करणाऱ्या प्रणालीचे विकसन व अंमलबजावणी करण्यात येणार आहे. कृषी आणि अन्न उत्पादनाच्या खरेदी- विक्रीसाठी एआय आधारित प्लॅटफॉर्म विकसित करण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांना देण्यात येणारी कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे साधन शेतकऱ्यांना देण्यात येणारी कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे साधन आहे. या योजनेअंतर्गत ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी करण्यात येणार असून सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे. ही राज्यातील सर्वात मोठी कर्जमुक्ती आहे.कर्जमुक्ती हा कायमस्वरूपी उपाय नसला तरी अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तो आवश्यक ठरतो. शेतकरी पुन्हा उभा राहावा आणि त्याला नव्याने कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा व्हावा, यासाठी कर्जमुक्तीकडे राज्य शासन एक महत्त्वाचे साधन म्हणून पाहते. राज्य शासनाने कर्जमाफीसंदर्भात तज्ज्ञ समिती नेमून या समितीला अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना, तसेच बँकिंग व्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्याची जबाबदारी दिली होती. समितीच्या अहवालाच्या आधारे काही निकष निश्चित करण्यात आले आहेत.

राज्य महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विविध कर्जमाफी योजना राबविल्या आहेत. दुष्काळ, अतिवृष्टी आणि इतर संकटांमुळे प्रभावित झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाने विविध कालखंडात कर्जमुक्तीचे निर्णय घेतले. या योजनांमुळे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून त्यांना पुन्हा शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळाली.

शेतकरी कर्जमुक्ती ही आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी दिलासादायक आणि आवश्यक उपाययोजना आहे. ती शेतकऱ्यांना नव्याने उभे राहण्याची संधी देणार आहे. याशिवाय ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होणार आहे. येत्या काळात शाश्वत कृषी विकासासाठी सिंचन, तंत्रज्ञान, बाजारपेठ, विमा आणि योग्य किंमत या घटकांचा समन्वय महत्वाचा ठरणार आहे. शेतकरी सक्षम झाला तरच देशाची अन्नसुरक्षा, ग्रामीण विकास आणि आर्थिक प्रगती अधिक बळकट होणार आहे.

**वर्षा फडके-आंधळे**
उपसंचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

### शेतकऱ्यांच्या समस्या केवळ कर्जमाफीने पूर्णपणे सुटू शकत नाहीत. त्यासाठी पुढील उपाय महत्त्वाचे ठरणार आहेत

- सिंचन सुविधांचा विस्तार
- पीकविमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी.
- शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर.
- साठवणूक व प्रक्रिया उद्योगांची उभारणी.
- शेतीमालाला योग्य व हमीभाव.
- शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांचे बळकटीकरण.
- कृषी शिक्षण व कौशल्य विकास.
- हवामान बदलाशी सुसंगत शेती पद्धतींचा प्रसार.

## जलजीवन मिशनचे काम रखडल्याने होळ ग्रामस्थ संतप्त; रस्त्यांची दुरवस्था, उपोषणाचा इशारा

### २०२४ पासून खोदलेले रस्ते अद्याप न दुरुस्त; रस्त्याचे काम शासनाने तात्काळ करावे- उत्तरेश्वर शिंदे



**केज/प्रतिनिधी** : केज तालुक्यातील होळ येथे जलजीवन मिशन योजनेअंतर्गत सुरू करण्यात आलेले काम गेल्या अनेक महिन्यांपासून रखडले असून, यामुळे गावातील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. या संदर्भात होळ येथील पत्रकार उत्तरेश्वर रघुनाथ शिंदे यांनी उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्याकडे निवेदन सादर करून तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. निवेदनानुसार, होळ गावात जलजीवन मिशनचे काम २०२४ पासून सुरू करण्यात आले. पाणीपुरवठा योजनेसाठी गावातील विविध रस्ते आणि गल्लीबोळांमध्ये खोदकाम करण्यात आले. मात्र काम अपूर्ण अवस्थेतच सोडण्यात आल्याने अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाळा सुरू झाल्याने या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असून नागरिकांना तसेच वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, काम पूर्ण करण्याबाबत ग्रामपंचायत आणि संबंधित कंत्राटदारांकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला. मात्र काम रखडल्यामुळे गावातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. तसेच जलजीवन मिशनचे उर्वरित काम पूर्ण करून गावात नियमित पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणात ग्रामपंचायत व कंत्राटदारांकडून परस्परविरोधी माहिती दिली जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासनाने याची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. काम तातडीने पूर्ण करून रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली नाही तर जलजीवन मिशनच्या फिल्टर केंद्रासमोर उपोषण करण्याचा इशाराही उत्तरेश्वर शिंदे यांनी दिला आहे.

होळ ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या

जलजीवन मिशनचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करावे. खोदलेले सर्व रस्ते पूर्ववत करून दुरुस्ती करावी. पाणीपुरवठा योजना लवकर सुरू करावी. कामातील दिरंगाईबाबत चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी. ग्रामस्थांना चुकीची माहिती देणाऱ्यांची चौकशी करावी.

## वाढदिवसाची पार्टी करून परतताना काळाचा घाला! कचऱ्याच्या गाडीने चिरडले; २४ वर्षीय तरुणाचा जागीच चिरडून मृत्यू

**नागपूर/प्रतिनिधी** : मित्राचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करून आनंदात घरी परतणाऱ्या दोन तरुणांना वाटेतच काळाने गाठले. नागपूर शहरात रात्रीच्या सुमारास झालेल्या एका भीषण आणि काळीज हेलावून टाकणाऱ्या अपघातात २४ वर्षीय तरुणाचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे, तर त्याचा एक मित्र गंभीर जखमी झाला आहे. कचरा संकलन करणाऱ्या एका भरधाव गाडीने त्यांच्या मोपेड दुचाकीला जोरदार धडक दिल्याने हा भीषण अपघात घडला. मिळालेली माहिती अशी की, २४ वर्षीय प्रणय दिलीप बडगे आणि त्याचा मित्र आर्य धर्मेश राठोड हे दोघे कुही इथे एका मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीसाठी गेले होते. पार्टी संपवून दोघेही रात्री मोपेड दुचाकीने नागपूर शहरात आपल्या घरी परतत होते. त्यांची दुचाकी नंदनवन येथील प्रजापती चौक उड्डाणपुलावरून जात असताना, अचानक समोरून आलेल्या एका भरधाव कचरा संकलन करणाऱ्या गाडीने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, प्रणय आणि आर्य दोघेही दुचाकीवरून रस्त्यावर फेकले गेले. दुर्दैवाने, त्याच वेळी कचरा गाडीचे जड चाक थेट रस्त्यावर पडलेल्या प्रणयच्या डोक्यावरून गेले. डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे अतिरक्तस्राव होऊन प्रणयचा घटनास्थळीच अत्यंत वेदनादायक मृत्यू झाला.

# अभिव्यक्तीच्या गळ्यावर सत्तेची सुरी: महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचा अंत्यविधी...!

- लोकशाहीच्या रणांगणात गुन्हेगारीची घुसखोरी: महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचा एक कृष्णपक्ष
- संसदेच्या वारीला गावगुंडाची स्वारी: महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेचा अंधार!
- लोकशाहीच्या अंगणी गुन्हेगारीची पेरणी: विवेक हरपलेल्या राजकारणाचा हा अंधकारमय प्रवास!

महाराष्ट्राची ओळख ही पुरोगामी विचारांचा वारसा सांगणारी, लोकशाही मूल्यांची जपणूक करणारी आणि वैचारिक प्रगल्भता जपणारी भूमी म्हणून राहिली आहे. मात्र, गेल्या काही दिवसांत घडलेल्या घटनांनी या प्रतिमेला तडे दिले आहेत. लोकप्रतिनिधींनी पत्रकार परिषदेत वापरलेली शिवराळ भाषा आणि प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारांना दिलेली जिवे मारण्याची धमकी, हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एका अत्यंत चिंताजनक आणि अध:पतित पर्वाचे दर्शन घडवते. जेव्हा संविधानाने निवडलेला लोकप्रतिनिधी संसदेच्या किंवा लोकशाहीच्या मूल्यांचा सन्मान करण्याऐवजी एखाद्या गावगुंडासारखी भाषा करतो, तेव्हा प्रश्न निर्माण होतो की आपण नक्की कोणत्या दिशेने वाटचाल करत आहोत...? राजकारणात दिवसागणिक विवेकशून्य बाहुबली प्रवृत्तीचे वाढते वर्चस्व ही लोकशाहीसाठी अत्यंत धोक्याची घंटा आहे.

पूर्वी आपण उत्तर प्रदेश किंवा बिहारच्या राजकारणाकडे पाहून 'गुन्हेगारीकरण' या शब्दाची चर्चा करायचो, पण आज तीच परिस्थिती महाराष्ट्रात ओढवणे हे दुर्दैवी आहे.



सत्तेच्या नशेत असताना जेव्हा एखाद्या खासदाराला कायद्याचा धाक राहत नाही, जेव्हा तो स्वतःच्याच पोलीस संरक्षणाच्या उपस्थितीत पत्रकारांना पाच-पाच माणसे मारल्याचे अभिमानाने सांगतो, तेव्हा हे केवळ वैयक्तिक वक्तव्य राहत नाही; तर ती राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाल्याची अधिकृत कबुली ठरते. ज्या कायद्याच्या राज्याची अपेक्षा जनतेने केलेली असते, त्या कायद्याचीच पायमल्ली जेव्हा रक्षकच करू लागतात, तेव्हा सामान्यांचा न्यायव्यवस्थेवरचा विश्वास उडू लागतो. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे.

प्रश्न विचारणे हे पत्रकाराचे कर्तव्य आहे, कारण त्या प्रश्नांच्या उत्तरातूनच जनतेच्या समस्यांची उकल होत असते. मात्र, सध्याच्या राजकारणात प्रश्न विचारणे हाच गुन्हा ठरवला जात आहे. लोकप्रतिनिधींचा अहंकार (इगो) इतका वाढला आहे की, विधायक टीकेला किंवा जनहितार्थ विचारलेल्या प्रश्नांना ते थेट धमक्यांनी उत्तर देत आहेत. हे वर्तन केवळ पत्रकारांच्या अधिकारांवर गदा आणणारे नाही, तर ते नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच करणारे आहे. सत्तेचा वापर हा लोकांसाठी असायला हवा, पण दुर्दैवाने तो स्वार्थासाठी आणि विरोधकांना किंवा प्रश्न विचारणाऱ्यांना दडपण्यासाठी केला जात आहे.

या सर्व प्रकारात महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, या प्रवृत्तीला कोणाचे संरक्षण आहे...? जेव्हा राजकीय नेते आपल्या समर्थकांकडून किंवा स्वतः अशा भाषेचा वापर करतात, तेव्हा ते अप्रत्यक्षपणे गुंडगिरीला खतपाणी घालत असतात. अशा प्रकारच्या भस्मासूर प्रवृत्तींना जर वेळीच लगाम घातला नाही, तर हीच गुन्हेगारी प्रवृत्ती उद्या महाराष्ट्राच्या विकासाच्या आड येईल. ज्या राज्याला प्रगत महाराष्ट्र म्हणून ओळखले जाते, तिथे जर राजकीय नेत्यांची पातळी शिवीगाळ आणि धमक्या इथपर्यंत घसरली असेल, तर हे राज्य नक्की कोणत्या दिशेला जात आहे, याचे आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे.

आज महाराष्ट्रासमोर पिण्याचे पाणी, रस्ते, बेरोजगारी आणि महागाई असे अनेक गंभीर प्रश्न समोर उभे आहेत. लोकप्रतिनिधीकडून यावर ठोस उपाययोजनांची जनतेला अपेक्षा असते.परंतु, या महत्त्वाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून केवळ बाहुबली प्रदर्शनावर भर देणे, हे त्यांच्या जबाबदारीच्या अभावाचे लक्षण आहे. ज्या परंपरेचा आपण अभिमान बाळगतो, त्या परंपरेत लोकमान्य टिळकांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत सर्वांनी विचारांची लढाई लढली, तलवारीची किंवा बंदुकीची नाही. पण आजचे राजकारण बंदुकीच्या नळीतून विचार दाबण्याचा जो प्रयत्न करत आहे, तो महाराष्ट्राच्या संस्कृतीला कधीही मान्य होणारा नाही. अखेर, हे लक्षात घेणे गरजेचे आहे की, लोकशाहीत कोणीही कायमचे सत्तेत नसते, पण लोकशाहीची मूल्ये कायमस्वरूपी असतात.

पत्रकारिता हा आरसा आहे आणि आरसा फुटल्याने वास्तव बदलत नाही. धमक्या देऊन किंवा दडपशाही करून कोणी सत्य लपवू शकत नाही. जर महाराष्ट्राला पुन्हा एकदा सुसंस्कृत आणि प्रगत राजकारणाकडे न्यायचे असेल, तर अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या राजकारण्यांना राजकारणातून बाहेरचा रस्ता दाखवणे आणि लोकशाही मूल्यांचा आदर करणारे नेतृत्व प्रस्थापित करणे ही काळाची गरज आहे. ही लढाई आता केवळ पत्रकारांची राहिलेली नाही, तर ती महाराष्ट्राच्या सन्मानाची आणि लोकशाही जिवंत ठेवण्याची एक अग्निपरीक्षा आहे.

**मा.ना.झेंपलवाड यादव**
**स्तंभ लेखक / राजकीय विश्लेषक**
**संपादक**
**दैनिक विष्णुपुरी एक्सप्रेस**

# जिल्हा वार्षिक योजनेची कामे विहित मुदतीत पूर्ण करा- पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

**लातूर/प्रतिनिधी :** सर्व शासकीय यंत्रणांनी विहित कालावधीमध्येच प्रशासकीय मंजुरीची कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक आहे. जिल्हा वार्षिक योजनेतील कामांना प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर निविदा प्रक्रिया तातडीने पूर्ण करून कामे विहित वेळेत पूर्ण करावीत. प्रत्येक काम चांगल्या दर्जाचे, टिकाऊ व गुणवत्तापूर्ण होईल, याची दक्षता घेण्याच्या सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज येथे दिल्या.




जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात झालेल्या जिल्हा नियोजन समिती बैठकीत पालकमंत्री श्री. भोसले बोलत होते. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष उषाताई पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार विक्रम काळे, आमदार बसवराज पाटील, आमदार संजय बनसोडे, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यावेळी उपस्थित होते. तसेच आमदार अभिमन्यू पवार आणि आमदार रमेश कराड दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. प्रारंभी दिवंगत माजी खासदार डॉ. जनार्धन वाघमारे आणि डॉ. गोपाळराव पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली.

जिल्ह्यामध्ये जनसुविधा योजनेंतर्गत गाव तेथे स्मशानभूमी अभियान प्रभावीपणे राबविण्यात यावे. गतवर्षी एकाच वर्षात १४८ गावांमध्ये स्मशानभूमी शेड उभारणी आणि अनुषंगिक कामे करण्यात आली आहेत. तसेच ज्या गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जमीन उपलब्ध नाही, अशा गावांमध्ये भूसंपादनाद्वारे जमीन उपलब्ध करून घेण्यसाठी संबंधित लोकप्रतिनिधी, तहसीलदार आणि गट विकास अधिकारी यांनी संयुक्तपणे प्रयत्न करावेत, असे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले. जिल्हा परिषदेच्या जवळपास सर्वच शाळा ग्रामीण भागात असून या शाळांमध्ये प्रामुख्याने मुलींचे स्वच्छतागृह, वीज कनेक्शन, सीसीटीव्ही यासारख्या मूलभूत सुविधांची कामे घेण्यात यावीत, मोडकळीस आलेल्या शाळांच्या बाबतीत वर्गखोल्यांच्या बांधकामांना प्राधान्य देण्यात यावे, असे त्यांनी सांगितले.

महाऊर्जा विभागाने पीएम सूर्यघर योजनेच्या अनुषंगाने शासकीय कार्यालयांच्या प्रस्तावांना मंजुरी द्यावी. जिल्हा विकास आराखड्याच्या अनुषंगाने प्राप्त झालेला नियतव्यय कोणत्याही परिस्थितीत नियमित योजनेकडे वळविण्यात येणार नाही, याची सर्व यंत्रणांनी दक्षता घ्यावी, असे पालकमंत्री म्हणाले. राज्यातील एक हजार लोकसंख्येची गावे सिमेंट रस्त्याने जोडण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यातील जास्तीत जास्त गावांना जोडणारे रस्ते समाविष्ट होण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

लातूर शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी पोलीस विभाग आणि महानगरपालिका यांनी संयुक्तपणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. गंजगोलाई परिसरात अतिक्रमण आणि बेशिस्त पार्किंगमुळे वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. त्यामुळे येथील अतिक्रमण हटवून पार्किंगला शिस्त लावण्यासाठी पोलीस व महापालिका प्रशासनाने आवश्यक कार्यवाही गतीने करावी, असे

पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले.

यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याचा अंदाज आहे. त्यामुळे जिल्ह्यातील प्रकल्पांमध्ये उपलब्ध पाणीसाठ्याचा काळजीपूर्वक वापर करावा. खरीप पेरणीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करावी. पुरेसा प्रमाणात पाऊस झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणी करू नये, असे आवाहनही पालकमंत्र्यांनी यावेळी केले. तसेच राज्य शासनाने बळीराजासाठी जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेतून जिल्ह्यातील एकही पात्र शेतकरी वंचित राहू नये, यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी काळजीपूर्वक काम करावे, असे पालकमंत्री श्री. भोसले यावेळी म्हणाले.

महावितरण कंपनीविषयी नागरिकांमधून मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत आहेत. काही ठिकाणी शाखा अभियंता उपलब्ध नाहीत, त्यामुळे ग्राहकांची गैरसोय होत आहे. मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेची कामे अधिक गतीने होण्याची आवश्यकता आहे. यासोबतच महावितरणमार्फत विजेचे नवीन खांब उभारताना रस्त्याच्या अगदी लगतच हे खांब उभारले जात आहेत. यामुळे भविष्यात अडथळा निर्माण होण्याची शक्यता असल्याने हे खांब हटवावेत, असे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले.

जिल्हा परिषद अध्यक्ष उषाताई पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार विक्रम काळे, आमदार बसवराज पाटील, आमदार संजय बनसोडे यांनीही अवेळी रस्ते, पाणी टंचाई, पायाभूत सुविधांची कामे आदीबाबत आपल्या सूचना मांडल्या.

## गतवर्षीच्या ५७७ कोटींच्या खर्चाला मंजुरी; यंदाच्या ६१२ कोटींच्या नियोजनास मान्यता

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात सर्वसाधारण योजनेतून ४४९ कोटी, अनुसूचित जाती घटक कार्यक्रमातून १२५ कोटी, आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेतून ३.२३ कोटी रुपये असा एकूण एकूण ५७७.२३ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला असून या संपूर्ण खर्चास जिल्हा नियोजन समितीने मंजुरी दिली. तसेच सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) करिता ४८४ कोटी रुपये, अनुसूचित जाती घटक कार्यक्रमासाठी १२५ कोटी रुपये व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेसाठी ३.२३ कोटी रुपयांचा अंतिम आराखडा तयार करण्यात आलेला आहे. या अनुषंगाने करण्यात आलेल्या नियोजनास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

## भाजपमध्ये मराठा वि. ब्राह्मण वाद? पवारांसाठी मी ब्राह्मण समाजाची मते मागितली, मेधा कुलकर्णींनी निवडणुकीचा इतिहास काढला





**पुणे/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीतच भाजपच्या खासदार मेधा कुलकर्णी आणि आमदार अभिमन्यू पवार यांच्यामध्ये नाराजीनाट्य रंगल्याचं दिसून आलं. पहिल्या रांगेत बसण्यावरून त्याच्यामध्ये वाद झाल्यांच दिसून आलं. त्यानंतर मेधा कुलकर्णी यांनी अभिमन्यू पवार यांच्यावर जोरदार टीका केली. अभिमन्यू पवार यांच्या निवडणुकीत आपण मतदानासाठी ब्राह्मण समाजाला आवाहन करण्यासाठी गेल्याचं त्यांनी सांगितलं. तसेच अभिमन्यू पवारांना सर्वकाही आपल्याच हाती असावं असं वाटतं, त्यामुळेच त्यांनी आपल्याला मुख्यमंत्र्यांना भेटू दिलं नसल्याचा दावाही त्यांनी केला. पुण्यात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यूपीएससी आणि एमपीएससी उपक्रमात यशस्वी विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात पहिल्या रांगेत बसण्यावरून भाजप खासदार मेधा कुलकर्णी आणि भाजपचे औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांच्यात नाराजीनाट्य रंगलं.

हा कार्यक्रम मराठा समाजाचा आहे, तुम्ही पहिल्या रांगेत बसला तर वाद निर्माण होऊ शकतो, असं अभिमन्यू पवारांनी म्हटलाचा दावा मेधा कुलकर्णी यांनी केला. मेधा कुलकर्णी म्हणाल्या की, ''पहिल्या रांगेमध्ये काही रिकाम्या खुर्च्या होत्या. त्या रिकाम्या असतील तर खासदार म्हणून माझी जागा पहिला येते. पण अभिमन्यू पवारांना त्या ठिकाणी बसायचं होतं, म्हणून धावधाव सुरू होती. प्रोटोकॉलनुसार, मी तिथे बसायला हवी होती. त्यावेळी अभिमन्यू पवार म्हणाले, हा कार्यक्रम मराठा समाजाचा आहे, तुम्ही तिथे बसाल तर वाद निर्माण होईल.''

हा कार्यक्रम मराठा समाजातील यशस्वी विद्यार्थ्यांचा होता. शासकीय प्रोटोकॉलनुसार खुर्च्यांची रचना असते, जातीप्रमाणे नसते, असं मेधा कुलकर्णी म्हणाल्या. मी कोणत्याही कार्यक्रमात गेल्यानंतर हिंदू म्हणून आपण पुढे आलं पाहिजे असं आवाहन करते, असंही त्या म्हणाल्या.

मेधा कुलकर्णी म्हणाल्या की, ''अभिमन्यू पवार ज्यावेळी निवडणुकीला सामोरे जात होते त्यावेळी ते मला फोन करून करून विनंती करत होते. माझ्याकडे या, ब्राह्मण समाजाच्या मेळाव्यात मतदानासाठी आवाहन करा, अशी विनंती त्यांनी केली. त्यावेळी माझी तब्येत ठिक नसतानाही मी त्यांच्यासाठी गेले आणि ब्राह्मण समाजाला एकगठ्ठा मतदान करण्याचं आवाहन केलं. आमच्या समाजाने त्यांना मतदान केलं.''

जातीचा विषय आला कुठे?

कार्यक्रम काय सुरू आहे आणि तुम्ही काय बोलता? इथे समाजाचा विषय येतो कुठे? आपल्यासमोर देशात मोठं आव्हान आहे. त्यासाठी हिंदू म्हणून एकत्र येणं हा मुद्दा आहे. एकमेकांच्या जाती काढून काय फायदा? असा प्रश्न मेधा कुलकर्णी यांनी केला.

आपल्याला या कार्यक्रमाच्या आधी देवेंद्र फडणवीसांना भेटू दिलं नसल्याचा आरोप मेधा कुलकर्णी यांनी केला. त्या म्हणाल्या की, ''या कार्यक्रमाच्या आधी देवेंद्र फडणवीस व्हीआयपी लाऊंजमध्ये बसले होते. त्यावेळी मी एक गंभीर केस घेऊन आले होते. मराठा समाजाचे बांधव त्यांच्या न्यायासाठी झगडत होते, त्यांना मी घेऊन गेले होते. पण अभिमन्यू पवार यांनी अडवले. तुम्ही आत यायचे नाही, यांना आत सोडू नका, असे त्यांनी पोलिसांना सांगितले. देवेंद्र फडणवीसांनी कुणाला भेटायचे आणि कुणाला नाही हे आता अभिमन्यू पवार ठरवणार का?''

बसण्यावरून कोणताही वाद नाही, पण यामध्ये जातीचा संबंध कोणता आला? अभिमन्यू पवार हे स्वत:ला कुणीतरी सुपिरिअर व्यक्ती समजतात असं दिसतंय. त्यामुळे मी माझ्या बॉससोबत बोलेन, असं मेधा कुलकर्णींनी स्पष्ट केलं. आपल्याला पुण्यातील अनेक कार्यक्रमांचे निमंत्रण नसते. आपणही पक्षाचे लहान कार्यकर्ते आहोत, पण डावलले जाते. मला मेट्रोच्या कामाचे निमंत्रण नव्हते, पीएमआरडीएच्या पुलाच्या कार्यक्रमाचेही निमंत्रण नव्हते. तरीही मी पेपरमध्ये वाचून कार्यक्रमाला जाते, असे सांगत मेधा कुलकर्णींनी नाराजी व्यक्त केली.

## लातूरमध्ये सामाजिक न्याय दिनानिमित्त आयोजित समता दिंडी, संविधान जनजागृती प्रभातफेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी :** राजर्षि छत्रपती शाहू महाराज जयंती, सामाजिक न्याय दिनानिमित्त लातूर येथे समाज कल्याण विभागामार्फत समता दिंडी व संविधान जनजागृती प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला लातूर शहरातील नागरिक, विद्यार्थी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच हिरवी झेंडी दाखवून या प्रभात फेरीला सुरुवात करण्यात आली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, सहायक आयुक्त यादव गायकवाड, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर ढमाले यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठी सदैव दक्ष होते आणि समाजातील दुर्लक्षित, मागासवर्गीय, दिव्यांग, वृद्ध, निराधार व दुर्बल घटकांच्या प्रती त्यांचा दृष्टिकोन विशेष सहानुभूतीचा व सुधारणावादी होता. त्यांनी या घटकांच्या कल्याणार्थ अनेक निर्णय अंमलात आणले. राजर्षी शाहू महाराजांचा हाच आदर्श समाजापुढे यावा या दृष्टिकोनातून त्यांचा जन्मदिवस २६ जून हा प्रतिवर्षी 'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.

सामाजिक न्याय दिनानिमित्त आयोजित समता दिंडी व संविधान जनजागृती प्रभातफेरीच्या सुरुवातीला भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. त्यानंतर प्रभातफेरीला सुरुवात झाली. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळा-गंजगोलाई -महात्मा गांधी चौक मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे आल्यानंतर या प्रभातफेरीचा समारोप करण्यात आला

या समता दिंडी व संविधान जनजागृती प्रभातफेरीमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्ये याबाबात जनजागृती करण्याच्या दृष्टीने संविधानातील कायद्यासमोर समानता, भेदभाव प्रतिबंध, अस्पृश्यता प्रतिबंध, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे अधिकार व कर्तव्ये या विविध अनुच्छेदांची तसेच अस्पृश्यता निर्मूलनाची माहिती असलेल्या घोषणावाक्यांचे फलक हाती घेवून जनजागृती केली. लातूर शहरातील ज्ञानेश्वर विद्यालय, यशवंत विद्यालय, देशिकेंद्र विद्यालय, राजमाता जिजामाता माध्यमिक विद्यालय, राजस्थान माध्यमिक विद्यालय, परिमल माध्यमिक विद्यालय आणि व्यंकटेश माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी या समता दिंडी व संविधान जनजागृती प्रभातफेरीमध्ये सहभाग घेतला.

## जिल्ह्यातील २ लक्ष ५६ हजार बालकांना पोलिओची मात्रा

**जालना/प्रतिनिधी :** संपुर्ण जालना जिल्हयामध्ये राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम रविवारी २८ जुन रोजी राबविण्यात येणार आहे. पल्स पोलिओ मोहिम अंतर्गत जालना जिल्हयातील ० ते ५ वयोगटातील २ लक्ष ५६ हजार ८७५ बालकांना पोलिओची मात्रा २८ जुन रोजी देण्यांचे उद्दिष्ट असुन ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांनी पल्स पोलिओ लस या दिवशी घ्यावी असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारे यांनी केले आहे.

पल्स पोलिओ मोहिमेसाठी सुक्ष्मकृती आराखडयाचे तयार करुन त्याप्रमाणे नियोजन केले आहे. ग्रामीण, शहरी भागामध्ये पल्स पोलिओ बुथचे आयोजन करुन कर्मचारी, पर्यवेक्षक यांची डयुटी लावण्यांत आलेली आहे. जिल्हयामध्ये पल्स पोलिओ मोहिम यशस्वी होण्यासाठी एकुण ५,५४७ मनुष्यबळाचा वापर करण्यांत येणार आहे. अंगणवाडी, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी नागरी आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, रेल्वे स्टेशन, बस स्टॅण्ड व काही खाजगी रुग्णालय येथील पोलिओ बुथवर ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओची लस सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यत देण्यांत येईल. दो बुंद जिंदगी के. दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलिओवर विजय दरवेळी.

## एकनाथ शिंदे यांचे विचार व त्यांनी घेतलेले लोकप्रिय निर्णय घराघरापर्यंत पोहचवा - शिवसेना तालुकाप्रमुख शेळके



**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांचे सर्वसामान्य माणसाच्या हिताचे निर्णय घराघरापर्यंत पोहोचवण्याचं काम आपण सर्व शिवसेना पदाधिकारी शिवसैनिकांनी करावं अशी आवाहन शिवसेना लातूर तालुकाप्रमुख बाबुराव शेळके यांनी कार्यकर्त्यांच्या बैठकीत केले. यावेळी काही पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रही देण्यात आले यावेळी ते म्हणाले की शिवसेना हा सर्वसामान्य कार्यकर्त्याचा पक्ष आहे आणि शिवसेनेच्या माध्यमातून नेहमीच ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राज्यकारण केले जाते आणि येणाऱ्या काळामध्ये शिंदे साहेबांना आपल्याला मुख्यमंत्री म्हणून पाहिजे असेल तर आपण कष्ट घेतलं पाहिजे शिवसेना घराघरात पोचली पाहिजे मनामनात पोहोचली पाहिजे त्यासाठी आपण निर्धार करूया की शिवसेना वाढीसाठी शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी आपण सज्ज होऊ या याप्रसंगी शिवसेनेचे लातूर ग्रामीण तालुकाप्रमुख राजकुमार सुरवसे ,युवती सेना जिल्हाप्रमुख अल्पनाताई वाघमारे ,लातूर शहर प्रमुख मोहन दिवटे, तालुका संघटक बाळासाहेब दंडीमे, शहर संघटक संतोष पाटील उपशहर प्रमुख शंकर गंगणे अंकुश कांबळे आधीसह शिवसैनिक उपस्थित होते

## प्रतिकूल काळाचा विसर पडल्यास अहंकार वाढतो! - समाजभूषण उत्तमराव तरकसे

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी पत्रकार संघ पत्रकार भवन आझाद मैदान जवळ मुंबई येथील सभागृहात कार्य दर्पण व महाराष्ट्र लोककल्याणकारी सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय कार्य दर्पण सन्मान पुरस्कार २०२६ चा सोहळा उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला कार्यक्रमास प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून महामानवाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.






सदर कार्यक्रमास प्रमुख सन्माननीय अतिथी म्हणून समाजभूषण मा श्री उत्तमराव दासू तरकसे आसरडोहकर (महाराष्ट्र शासनाच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ''करपली भाकरकार'' ज्येष्ठ साहित्यिक कवी व विचारवंत) मा श्री सुनील आगवणे (अतिरिक्त आयुक्त आयकर विभाग) (प्रसिद्ध संगीतकार) कौशल इनामदार , डॉक्टर जे के महाडिक (अधीक्षक जलसंपदा विभाग) डॉक्टर अरविंद सय्यद (चेअरमन बँक हॉस्पिटल मुंबई) पंकज पाडळे (लोककला व नृत्य अभ्यासक व संशोधक) (कर्करोग शास्त्रज्ञ डॉक्टर) अमजद खान पठाण (कोळी नटसम्राट वेसावकर फेम) राजेश खर्डे व संस्थेचे संस्थापक एनडी खान सलमा खान यांच्या हस्ते अनेक क्षेत्रांमध्ये मोलाचे कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

समाजभूषण मा श्री उत्तमराव तरकसे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना प्रतिकूल काळाचा विसर पडल्यास अहंकार वाढतो..! असे प्रबोधनात्मक विचार मांडत संस्थेच्या वतीने त्यांना सुद्धा मानाचा व प्रतिष्ठेचा पुरस्कार शाल श्रीफळ पुष्पगुच्छ सन्मानपत्र व सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले तेव्हा समाजभूषण तरकसे यांनी संस्थेचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी यांचे आभार मानत उपस्थित मान्यवरांना त्यांचा नुकताच कमी अवधीत प्रकाशित होऊन राज्य शासनाच्या पुरस्कारासह अनेक सामाजिक व सांस्कृतिक पुरस्काराने सन्मानित होऊन साहित्याच्या बागेत फुललेल्या वास्तवातील परिस्थितीचे वर्णन केलेल्या करपली भाकर कथासंग्रहाची प्रत भेट देण्यात आली .

तसेच एन डी खान यांनी प्रास्ताविकेतून संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला सलमा खान यांनी कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक म्हणून काम पाहिले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक कदम व आनंघा जाधव यांनी खूप सुरेख केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ विजय मोरे यांनी केले सर्व उपस्थिताना चहा नाश्ता करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## सर्वोच्च न्यायालयातील विशेष लोकअदालतीसाठी लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणची तयारी बैठक



**लातूर/प्रतिनिधी ::** सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली आणि राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या वतीने समाधान समारोह या उपक्रमांतर्गत आगामी २१ ते २३ ऑगस्ट, २०२६ या कालावधीत सर्वोच्च न्यायालयात विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष लोकअदालतीमध्ये लातूर जिल्ह्यातील प्रलंबित प्रकरणांमध्ये सौहार्दपूर्ण तडजोड घडवून आणण्याच्या उद्देशाने जिल्हा प्रशासनाच्या विविध विभागांची एक महत्त्वपूर्ण पूर्वतयारी बैठक गुरुवारी लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालयात झाली. ही बैठक लातूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारुका यांच्या मार्गदर्शनाखाली दुपारी २ वाजता आयोजित करण्यात आली होती.

बैठकीत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे व्यंकटेश गिरवलकर यांनी उपस्थित सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना या विशेष लोकअदालतीचे महत्त्व सांगून प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना दिल्या.

या प्रकारची प्रकरणे असणार तडजोडीसाठी

लातूर जिल्ह्यातून सर्वोच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेली सर्व प्रकारची प्रलंबित तडजोडपात्र फौजदारी व दिवाणी प्रकरणे या विशेष लोकअदालतीमध्ये ठेवली जाणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने बँकींग, दिवाणी दावे, मोटार वाहन अपघात नुकसान भरपाई, ग्राहक तक्रार निवारण, परक्राम्य संलेख अधिनियम कलम १३८ (धनादेश अनादर/चेक बाऊन्स प्रकरणे), कौटुंबिक वाद, कामगार व औद्योगिक वाद, भूसंपादन प्रकरणे आणि सेवेशी संबंधित (सर्व्हिस मॅटर्स) प्रकरणांचा समावेश असणार आहे. पक्षकारांमध्ये आपसांतील वाद सामोपचाराने मिटवून सौहार्दपूर्ण तडजोड व्हावी, यावर या बैठकीत भर देण्यात आला.या पूर्वतयारी बैठकीला लातूरच्या उपजिल्हाधिकारी संगीता टकले, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बी.डी. वाघ, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक एस.एम. बावकर, निलंगा उपविभागीय कार्यालयाचे नायब तहसीलदार एस.ए. कानडे आणि लातूर टीएमसी सेलचे सहायक पोलीस निरीक्षक एस. व्ही. मनाळे उपस्थित होते.तसेच 'एमआयडीसी'चे बी.पी. यलमटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधीर बनशेळकीकर, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे आर.जी. गायकवाड, समाज कल्याण कार्यालयाचे प्रादेशिक उपायुक्त एस.पी. शिवाळकर, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी एस.एन. श्रीमंगले, अन्न व औषध प्रशासनाचे पी.जी. व्हाडे व एस. जे. बोचरे, आरोग्य सेवा उपसंचालक शेख एच.एम. यांसह विविध विभागांचे अन्य वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी या बैठकीला उपस्थित होते.

## सामाजिक न्याय दिनी शाहू महाराजांच्या जयघोषात समता दिंडी उत्साहात दसरा चौकात राजर्षी शाहू महाराजांच्या पुतळ्यास मान्यवरांकडून अभिवादन

**कोल्हापूर/प्रतिनिधी** : 'लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज की जय!' या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला आणि सामाजिक न्यायाचा संदेश देणाऱ्या समता दिंडीला कोल्हापूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिन 'सामाजिक न्याय दिन' म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त जिल्हा प्रशासन आणि सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग यांच्या वतीने दसरा चौक येथे समता दिंडीसह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

समता दिंडीचा शुभारंभ पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. पालकमंत्री आणि मान्यवरांनी समता दिंडीच्या पालखीला खांदा दिला. यावेळी खासदार शाहू छत्रपती महाराज, आमदार जयंत आसगावकर, आमदार अमल महाडिक, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, जात पडताळणी समितीच्या अध्यक्षा सुषमा सातपुते, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे अधिकारी अमित घवले, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण समितीच्या प्रशासन अधिकारी जयश्री जाधव तसेच सम ाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त सचिन साळे उपस्थित होते. तत्पूर्वी सर्व मान्यवरांनी शाहू महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन केले.

दरवर्षी २६ जून हा दिवस राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिन 'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा केला जातो. आपल्या कारकीर्दीत शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाची तत्त्वे प्रत्यक्षात आणत मागासवर्गीय, दिव्यांग, वृद्ध, निराधार आणि समाजातील वंचित घटकांच्या कल्याणासाठी अनेक दूरदृष्टीचे निर्णय घेतले. त्यांच्या कार्याचा आदर्श समाजासमोर राहावा आणि कोल्हापूर ही त्यांची जन्मभूमी व कर्मभूमी असल्याने हा दिवस विशेष उत्साहात साजरा करण्यात आला.समता दिंडीने व्हीनस कॉर्नर, माईसाहेब पुतळा, बिंदू चौक येथे महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना अभिवादन केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक, कोल्हापूर महानगरपालिका परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, गंगाराम कांबळे स्मारक येथे अभिवादन करून सी.पी.आर. मार्गे दसरा चौक मैदानात दिंडीची सांगता झाली.समता दिंडीत जिल्ह्यातील शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, सामाजिक न्याय विभागाचे अधिकारी व कर्मचारी, शासकीय वसतिगृहे, निवासी शाळा, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या आश्रमशाळा तसेच विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# लातूर वृत्त प्रवाह साप्ताहिकाची दमदार एन्ट्री; प्रकाशन सोहळा थाटात संपन्न

## संपादक नेताजी जाधव यांच्या प्रिंट मीडियातील पदार्पणाचे स्वागत; पत्रकारांचा स्नेहमेळावा

**लातूर/प्रतिनिधी :** अल्पावधित लोकप्रिय झालेल्या लातूर नेता वेब पोर्टल आणि एलटीएन न्यूज चॅनलचे संपादक नेताजी जाधव यांनी आता साप्ताहिक लातूर वृत्त प्रवाह सुरू करून प्रिंट मीडियामध्ये दमदार पाऊल टाकले आहे. राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून शुक्रवारी दिनांक २६ जून रोजी येथील हॉटेल कनैयाच्या सभागृहात आयोजित शानदार कार्यक्रमात या साप्ताहिकाचा प्रकाशन सोहळा पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. बालाजी कुटवाडे होते, तर जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप यांच्या हस्ते साप्ताहिकाचे प्रकाशन झाले. यावेळी अखील भारतीय मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष नरसिंह घोणे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अशोक देडे, ज्येष्ठ पत्रकार व मराठवाडा नेताचे संपादक रामेश्वर बद्दर, रघुनाथ बनसोडे, शशिकांत पाटील, महेंद्र जोंधळे आणि प्रा. यू. डी. गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या प्रास्ताविकात संपादक नेताजी जाधव म्हणाले की, डिजिटल आणि प्रिंट मीडियानंतर आता वर्षभरात लातूर एफएम सुरू करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. सकारात्मक पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक न्याय आणि व्यवस्था परिवर्तनाचे काम करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी मुद्रित माध्यमाच्या आव्हानांवर भाष्य केले. सध्या सरकारकडून लादली जाणारी जाचक नियमावली आणि प्रिंट मीडियासमोरील अडचणींविषयी त्यांनी चिंता व्यक्त केली. पत्रकार नितीन भाले यांनी पत्रकारांच्या समस्या पोटतिडकीने मांडल्या. या प्रकाशन सोहळ्याचे रूपांतर एका प्रकारे पत्रकार स्नेहमेळाव्यात झाले होते. सुशील सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले, तर लिंबराज पन्हाळकर यांनी आभार मानले.

या सोहळ्यास महादुभाऊ रसाळ, गणपत राठोड, के. वाय. पटवेकर, नितीन भाले, सर्फराज सय्यद, बंटीभैय्या गायकवाड, दत्ता परळकर, लहु शिंदे, राम जाधव, चंद्रकांत सुर्यवंशी, महादेव डोंबे, शिवाजी कांबळे, सुधाकर फुले, हमीद शेख, विष्णू आष्टीकर, प्रकाश कंकाळ, दिनेश गिरी, रवी बिजलवाड, डी. एल. वाघमारे, अहिल्या कसपटे, राम रोडगे, संतोष सोनवणे, शरद पवार, नितीन बनसोडे, सुनील गवळी, धनराज वाघमारे, विजय कवाळे, आरुण हांडे, संदिप भोसले, सुनिल कांबळे, अमोल घायाळ, श्रीकांत चलवाड, अजय घोडके, शेख फारुक, खंडेराव देडे, विशाल सुर्यवंशी, यशवंत पवार, व्यंकटेश नरसिंगे, वैभव बालकुंदे, मारोती काळे, साईनाथ घोणे, सुजित नाईक, राजेंद्र देबटवार यांच्यासह लातूरमधील अनेक पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पत्रकारांना शिवीगाळ व धमकी देणाऱ्या खासदार पाटील यांचा निषेध

प्रकाशन सोहळ्यादरम्यान उपस्थित पत्रकारांनी खासदार संजय दिना पाटील यांचा जाहीर निषेध केला. पत्रकारांना अभद्र भाषेत शिवीगाळ करणे आणि जीवे मारण्याची धमकी देणे ही घटना लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा अपमान करणारी आहे. लोकशाहीत पत्रकारांचा सन्मान झालाच पाहिजे, अशी अपेक्षा यावेळी जेष्ठ पत्रकार शशिकांत पाटील यांनी व्यक्त केली.

## घराखाली खेळणाऱ्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**भिवंडी/ प्रतिनिधी :** नसरापूर अत्याचार घटनेच्या जखमा ताज्या असतानाच आणखी एक काळीज पिळवटणारी घटना भिवंडीत घडली. भिवंडी कशेळीत घडलेल्या या घटनेमध्ये एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक बाब सम ोर आली. याबाबतची तक्रार दाखल होताच नरपोली पोलिसांनी अवघ्या ३ तासात आरोपीला अटक केली. पोलिस उपयुक्त डॉ. पवन बनसोड यांनी सदर कारवाईसंदर्भातील माहिती दिली. गुरुवार, २५ जून २०२६ ला संध्याकाळी ५-५.३० च्या सुमारास कशेळी परिसरात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीला शेजारी राहणाऱ्या आरोपीने खेळण्याचे आमिष दाखवून फ्लॅटमध्ये नेले. तिच्या भावाला पाणी आणायला पाठवून आरोपीने मुलीवर अत्याचार केला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि तातडीनं कारवाई सुरू केली. भिवंडीचे पोलीस उपायुक्त पवन बनसोड यांच्या माहितीनुसार, 'आम्हाला ११२ आणि नागरिकांचा फोन आला. तातडीने पथक रवाना झाले. आरोपी पळून जाण्याच्या तयारीत होता, पण २ ते ३ तासात त्याला अटक केली. पीडित मुलगी सध्या शासकीय रुग्णालयात उपचार घेत आहे.

## दयानंद विज्ञानमध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन



**लातूर/प्रतिनिधी ::** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२६ जून २०२६ रोजी राजर्षी शाहू महाराज यांची जयंती व सामाजिक न्याय दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर व पर्यवेक्षिका डॉ. संध्या कोल्हे यांनी लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सामाजिक न्याय दिनाच्याही शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्काराने प्रवीण बागडे यांचा गौरव



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी:** निळे प्रतिक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आयोजित राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार-२०२६ सोहळा तसेच दैनिक निळे प्रतिकच्या १७ व्या वर्धापन दिन आणि राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त आयोजित भव्य कार्यक्रमात ज्येष्ठ लेखक, कवी व सामाजिक विश्लेषक प्रवीण बागडे (नागपूर) यांना राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र सभागृह, छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यात बुद्धिस्ट उद्योजक गोल्डमॅन रोहित पिसाळ यांच्या हस्ते प्रवीण बागडे यांना पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र तसेच राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या टाळ्यांच्या गजरात त्यांचा गौरव करण्यात आला.

पत्रकारिता, साहित्य, सामाजिक प्रबोधन, संविधानिक मूल्यांचा प्रचार-प्रसार तसेच समाजहितासाठी सातत्याने केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन प्रवीण बागडे यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर सोमकुवर, सामाजिक कार्यकर्त्या ज्योती सिंगारे यांच्यासह विविध क्षेत्रांतील एकूण २० मान्यवरांचा गौरव करून त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन आयु. रतनकुमार साळवे, मुख्य संपादक, दैनिक निळे प्रतीक यांनी केले होते. कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, साहित्यिक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल आयोजकांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात आले.

## पॉक्सो प्रकरणी आरोपीला १३ वर्षांची सक्तमजुरी; उत्कृष्ट तपासामुळे न्यायालयाचा कडक निर्णय

### पीएसआय सुकुमार बनसोडे यांच्या तपासाचे वरिष्ठांकडून कौतुक

**धाराशिव/प्रतिनिधी :** नळदुर्ग पोलीस ठाण्यात सीआर क्रमांक ११७/२०२२ अन्वये दाखल असलेल्या बलात्कार व पॉक्सो प्रकरणात माननीय जलदगती जिल्हा न्यायालय, धाराशिव यांनी मुख्य आरोपीला १३ वर्षे सश्रम कारावास व ७५ हजाराचा दंडाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक तथा पिंक पथक प्रमुख सुकुमार बनसोडे यांच्याकडे सोपविण्यात आला होता.

तपासादरम्यान आरोपीला अटक करून पीडित अल्पवयीन मुलगी व आरोपीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तसेच पीडितेला आरोपीपासून झालेल्या बालकाची डीएनए तपासणी, १३ साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय अहवाल, आरोपी व पीडितेचे कपडे जप्त करून त्यावरील पुरावे तसेच फॉरेन्सिक अहवालाच्या आधारे अत्यंत बारकाईने तपास पूर्ण करण्यात आला.

या भक्कम पुराव्यांच्या आधारे जिल्हा न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत १३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. या यशस्वी तपासाबद्दल तपास अधिकारी पीएसआय सुकुमार बनसोडे तसेच त्यांचे सहकारी पोलीस अंमलदार ऋषिकेश गवळी, बालाजी जाधव आणि एएसआय गौतम शिंदे यांच्या कामगिरीचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून कौतुक करण्यात येत आहे.

# संवैधानिक समूहातील सर्व नागरिकांचे ऐक्य ही काळाची गरज : बी. बी. मेश्राम

## राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त मूलभारती एकता परिषद उत्साहात संपन्न

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी:** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त गांधी भवन येथे ''सुदृढ एकसंघ भारताच्या निर्मितीसाठी संवैधानिक (, , व इतर) समूहातील सर्व नागरिकांचे ऐक्य होणे ही काळाची गरज आहे'' या विषयावर मूलभारती एकता परिषद उत्साहात संपन्न झाली.

अध्यक्षीय समारोपात फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम यांनी सांगितले की, मानवीय दृष्टिकोनातून मानसिकता विकसित केल्याशिवाय मूळ भारतीयांचे ऐक्य साध्य होणार नाही. समाजातील गरजू विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी नालंदा अकादमीसारखे उपक्रम उभारणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तनवादी नेतृत्व निर्माण करणे हेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ''ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टू पॉलिटिक्स'' या संकल्पनेचे मूळ उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मेश्राम यांनी सांगितले की, परिषदेत वापरण्यात आलेला ''मूलभारती'' हा शब्द मूलभारती चळवळीचे पितामह बी. शामसुंदर यांच्या विचारधारेतून प्रेरित आहे. फुले-शाहू-आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारांची प्रभावी मांडणी करणारे कार्यकर्ते घडविण्याचे कार्य स्टडी फाउंडेशन सातत्याने करीत असून, त्यातून शासनकर्ती जमात निर्माण करण्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उद्घाटनप्रसंगी सामाजिक कार्यकर्त्या ॲड. प्रतिज्ञा भगत यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा उल्लेख करताना अंधश्रद्धा, जातिभेद व अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. आंतरजातीय विवाहाला त्यांनी दिलेली मान्यता ही सामाजिक परिवर्तनाची ऐतिहासिक पायरी असल्याचे त्यांनी सांगितले. प्रमुख वक्ते प्रा. श्रीकिसन मोरे यांनी राष्ट्रनिर्मितीसाठी सामाजिक ऐक्य आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे बी. जी. बनसोडे यांनी झुंडशाहीऐवजी लोकशाही मूल्ये व राजकारणाचे व्याकरण आत्मसात करण्याचे आवाहन केले. भारतीय भटके विमुक्त आदिवासी ओबीसी संघर्ष महासंघाचे संस्थापक अध्यक्ष अशोक धनगावकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान निर्मितीतील योगदानामुळे वंचित समाजाला हक्क व अधिकार प्राप्त झाल्याचे सांगितले.

राज गायकवाड यांनी युवकांची भूमिका अधोरेखित केली. सम्यक रामटेके यांनी शिक्षण व्यवस्थेतील गुणवत्तेवर भाष्य केले, तर सत्यशोधक विचार प्रचारक अरविंद खैरनार यांनी मूळ भारतीयांच्या ऐक्याची आवश्यकता अधोरेखित केली.



कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

ॲड. सुनीलकुमार नागवंश व शाहीर रामदास धुमाळ यांनी गीत सादर केले. प्रास्ताविक प्रा. विलास कटारे यांनी केले. सूत्रसंचालन शशिकांत काळे, आभार मिलिंद बागुल यांनी मानले, तर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची भूमिका ॲड. विलास रामटेके यांनी स्पष्ट केली. डॉ. कल्पना गंगावणे, सुभाष ठोकळ, डी. बी. मेश्राम, डॉ. रमेशचंद्र धनेगावकर, महादेव डांबरे यांनी यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न केले. परिषदेला राज्यातील विविध जिल्ह्यांतील शेकडो प्रतिनिधी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.